## सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## सार्वत्रिक निवडणूक २०२५

### मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामधील तमाम नागरीकांना या जाहीर निवेदनाव्दारे सुचित करणेत येत आहे की, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी मा.राज्य निवडणूक आयोगाकडील दिनांक २६/११/२०२५ च्या सुधारित आदेशान्वये मतदार यादीशी संबंधित सुधारित कार्यक्रम जाहीर करणेत आलेला आहे तो खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | निवडणूकीचा टप्पा | दिनांक १३/११/२०२५ च्या पत्रानूसार निर्धारित केलेला दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादीवर, हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | २७/११/२०२५ | ०३/१२/२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | ०५/१२/२०२५ | १०/१२/२०२५ |
| ३ | मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे | ०८/१२/२०२५ | १५/१२/२०२५ |
| ४ | मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | १२/१२/२०२५ | २२/१२/२०२५ |

प्रारुप मतदार याद्या महानगरपालिका मुख्यालयातील प्रभाग समिती क्र. १ कार्यालय महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग समिती क्र. २ कार्यालय, विश्रामबाग गणपती मंदिरांच्या मागील बाजूस, प्रभाग समिती ३ करीता कुपवाड विभागीय कार्यालय, कुपवाड तसेच प्रभाग समिती क्र. ४ करीता मिरज विभागीय कार्यालय, मिरज या ठिकाणी पहाणेसाठी उपलब्ध आहे. तसेच प्रारुप मतदार यादी महानगरपालिका संकेतस्थळ www.smkc.gov.in येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. मतदार यादीबाबत हरकती / सूचना स्वीकारण्यासाठी प्रभाग समिती क्र. १ कार्यालय महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग समिती क्र. २ कार्यालय, विश्रामबाग गणपती मंदिरांच्या मागील बाजूस, प्रभाग समिती ३ करीता कुपवाड विभागीय कार्यालय, कुपवाड तसेच प्रभाग समिती क्र. ४ करीता मिरज विभागीय कार्यालय, मिरज येथे बारनिशी विभाग येथे व्यवस्था करण्यात आलेली आहे. दिनांक:-०३/१२/२०२५ नंतर टपाल/ समक्ष / ई-मेलव्दारे किंवा इतर कोणत्याही प्रकारे प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचना स्वीकारल्या जाणार नाहीत. याची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**आयुक्त तथा प्रशासक**
**सांगली, मिरज आणि कुपवाड शहर**
**महानगरपालिका**

**जा.क्र./मनपा/निवड/जनग/सविवि/सां/ १५६ /२०२५-२६**
**सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका**
**दिनांक :- २७ /११/२०२५**